प्रेस नोट ता. ०४/११/२०२३

# जिवंत काडतुसांसह गावठी कट्टा बाळगणा-या इसमांला अटक

## गुन्हे शाखा युनिट २ ची कारवाई

दिनांक ०३/११/२०२३ रोजी गुन्हे शाखा युनिट २ चे प्रभारी अधिकारी पोलीस निरीक्षक जितेंद्र कदम यांचे अधिपत्याखालील पोलीस अंमलदार पेट्रोलिंग करुन रेकॉर्डवरील गुन्हेगारांची तपासणी करीत असतांना पोलीस हवालदार १०२३ जमीर तांबोळी व ६५८ संतोष इंगळे यांना त्यांचे गोपनिय बातमीदाराकरवी खात्रीशीर बातमी मिळाली कि, महादेवनगर चिखली येथे मुळचा उत्तरप्रदेशचा असलेला एक इसम गावठी कट्टा कमरेला लावुन फिरत आहे अशी बातमी मिळाली.

गुन्हे शाखा पोलीस उप आयुक्त स्वप्ना गोरे व सहा.पोलीस आयुक्त सतिश माने यांना माहीती कळवुन त्यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा युनिट २ चे प्रभारी अधिकारी पोलीस निरीक्षक जितेंद्र कदम यांनी गुन्हे शाखा युनिट २ चे पोलीस अंमलदार संतोष इंगळे, जमीर तांबोळी, सागर अवसरे, नामदेव कापसे यांचे पथकाला सुचना व मार्गदर्शन करुन महादेवनगर चिखली परिसरात सापळा लावला. बातमीदाराने सांगितलेल्या वर्णनाचा इसम संशयितरित्या फिरत असल्याचे पोलीस पथकाला दिसुन आले. त्याचवेळी संशयित इसमाला पोलीस आल्याची चाहूल लागल्याने तो पळुन जावु लागला. पोलीस पथकाने त्याचा पाठलाग करुन शिताफीने ताब्यात घेतले. त्याचे नाव जिशान शब्बीर खान वय १९ वर्षे रा. रुम नंबर ३, भवानी स्टिल बिल्डींग, चिखली बसस्टॉप चिखली असे असुन जिशान शब्बीर खान याची अंगझडती घेतली असता त्याचे कमरेला एक गावठी कट्टा तसेच दोन जिवंत काडतुस त्याचेकडे मिळुन आली.

इसम नामे जिशान शेख हा टेम्पो चालविण्याचे काम करीत असुन त्याचा गावठी कट्टा बाळगण्याचा नक्की काय उदेश आहे याबाबत विचारपुस केली असता त्याने उडवा उडवीची उत्तरे दिली व गावठी कट्टा उत्तरप्रदेश येथुन आणल्याची माहीती सांगितली. जिशान शेख याने गावठी कट्टा नक्की कोणत्या कारणासाठी व कोणाला देण्यासाठी आणला, आतापर्यंत नक्की किती अग्निशस्त्रे उत्तरप्रदेश येथुन आणली व कोणाला दिली आहेत याबाबत अधिक सखोल तपास सुरु आहे. इसम नामे जिशान शब्बीर खान वय १९ वर्षे रा. रुम नंबर ३, भवानी स्टिल बिल्डींग, चिखली बसस्टॉप चिखली याचे विरुध्द भारतीय शस्त्र अधिनियम १९५९ चे कलम ३ (२५) व महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७ (१) (३) सह १३५ प्रमाणे चिखली पोलीस ठाणे येथे गुन्हा नोंद करण्यात आला असुन अधिक तपास सुरु आहे.

सदरची कारवाई पिंपरी चिंचवडचे पोलीस आयुक्त श्री विनय कुमार चौबे, सह पोलीस आयुक्त डॉ. श्री संजय शिंदे, अप्पर पोलीस आयुक्त श्री वसंत परदेशी, पोलीस उप आयुक्त गुन्हे स्वप्ना गोरे, सहाय्यक पोलीस आयुक्त गुन्हे श्री सतिश माने यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा युनिट २ चे प्रभारी अधिकारी पोलीस निरीक्षक श्री जितेंद्र कदम, पोलीस अंमलदार दिलीप चौधरी, जमीर तांबोळी, संतोष इंगळे, प्रमोद वेताळ, उषा दळे, देवा राऊत, सागर अवसरे, नामदेव कापसे यांनी केली आहे.

(स्वप्ना गोरे)
पोलीस उप आयुक्त गुन्हे
पिंपरी चिंचवड